'दैनिक महासागर' साठी संपर्क

महाराष्ट्रातील सर्व परिचित दैनिक 'महासागर' च्या बातम्या, जाहिराती
व अंकासाठी संपर्क तसेच यवतमाळ जिल्ह्यात
सर्वत्र अतिरिक्त प्रतिनिधी व विक्रेते नियुक्त करणे आहे.
संपर्क व्दारा हॉटेल स्वाद थाली, आयडीबीआय बँके समोर, माईंदे चौक, यवतमाळ
संपर्क ९४२३४३३२४४ / ८७८८५०७०४४ / ९१७५५००७४६


# महाशिवरात्री निमित्त सिद्धेश्वर महादेव मंदिरात भक्तांची गर्दी








**यवतमाळ / आर्णी, दि.१५, महासागर प्रतिनिधी**: आज महाशिवरात्री निमित्त यवतमाळ शहरासह जिल्ह्यातील हजारो भाविकांनी, आपापल्या सोयीनुसार ठिक ठिकाणच्या महादेव मंदिरात जाऊन, भगवान शिवशंकराचे दर्शन घेतले. आज दिवसभर सर्वच महादेव मंदिरात भाविकांनी प्रचंड गर्दी केल्याचे दृश्य बघायला मिळाले. त्यात यवतमाळचे केदारेश्वर मंदिर,मन्देव येथील महादेव मंदिर व लोहारा येथील महादेव मंदिरासह जिल्ह्यातील विविध महादेव मंदिरात भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती.

महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त आर्णी येथील प्राचीन श्री सिद्धेश्वर महादेव मंदिरात भाविकांची अलोट गर्दी उसळली. पहाटेपासूनच मंदिर परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाल्याने वातावरण अत्यंत मंगलमय व उत्साहपूर्ण झाले होते.

महाशिवरात्रीनिमित्त मंदिरात विशेष अभिषेक, रुद्रपाठ, भजन-कीर्तन आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी बेलपत्र, फुले आणि दुग्धाभिषेक अर्पण करून भगवान शंकराचे दर्शन घेतले. अनेक भक्तांनी उपवास करून रात्रभर जागरण करत शिवनामस्मरण केले. आज सकाळी शावमहापुराण पोथी चे पुजन करण्यात आले तसेच भगवान शिव च्या मुखौट्याची फुलांनी सजावट करून दर्शनासाठी ठेवण्यात आले

रात्री ला सिद्धेश्वर भक्त मंडळ द्वारे महाआरती चे आयोजन करण्यात आले त्यात हजरों शिवभक्तांनी महाआरतीत सहभाग घेतला. तदनंतर यवतमाळ येथिल शिवभ्क्तांची भजनसंध्या संपन्न झाली.

महाशिवरात्रि च्या पावन पर्वावर मंदीर परिसर आकर्षक विद्युत रोषणाई व शिवलिंगाची फुलांच्या सजावटीने उजळून निघाला होता. स्थानिक ग्रामस्थ व मंदिर समितीच्या वतीने भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची, प्रसादाची तसेच रांग व्यवस्थेची उत्तम सोय करण्यात आली होती. पोलिस प्रशासन व स्वयंसेवकांनीही गर्दी सुरळीत पार पडावी यासाठी विशेष दक्षता घेतली.

महाशिवरात्रीच्या निमित्ताने आर्णी शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र धार्मिक उत्साहाचे चित्र पाहायला मिळत आहे. श्रद्धा, भक्ती आणि शिस्तबद्ध आयोजन यामुळे यंदाची महाशिवरात्री आर्णीकरांसाठी संस्मरणीय ठरली आहे.

# पुसद-उमरखेड येथे दहशतवाद विरोधी पथकांची छापेमारी



**पुसद, दि.१५, महासागर प्रतिनिधी**: शहरातील वसंतनगर पो स्टे अंतर्गत पार्वती नगर परिसरातील ११ ठिकाणी तरुणांचा 'ब्रेनवॉशिंग' करून राज्यात घातपाती कारवाया घडवण्याच्या कट रचल्याच्या संशयावरून महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने काल मध्यरात्रीपासून छापीमारी करून कारवाई केल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळाल्या सूत्रानुसार राज्यात घातपाती कारवाया घडविण्याचा कट रचला जात असल्याच्या संशयावरून दहशतवाद विरोधी पथकाने काल मध्यरात्रीपासून पुसद शहरात अनेक ठिकाणी कारवाई सुरू केली आहे. पुसद आणि उमरखेड आणि पश्चिम महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यांत साधारण २० हून अधिक ठिकाणी एकाच वेळी छापे टाकण्यात आले असून, यामुळे संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. पुसदसह उमरखेडमध्ये २० दहशतवाद विरोधी पथकांचा वेढा घातल्याने ही यवतमाळ जिल्ह्यातील सर्वात मोठी कारवाई असल्याचे आज पाहावयास मिळाले आहे. दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख चंद्रकिशोर मीणा यांच्या नेतृत्वाखाली २० विशेष पथकांनी मध्यरात्री पुसद आणि उमरखेड शहरात एन्ट्री केली. राज्यातील तरुणांचे ब्रेनवॉशिंग करून त्यांना दहशतवादी संघटनांकडे आकर्षित केले जात असल्याची गुप्त माहिती दहशतवादी विरोधी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पुसद शहरात ११ ठिकाणी शोधमोहीम राबविण्यात आली असून डझनाहून अधिक संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. दहशतवाद विरोधी पथकाने ही छापेमारी मोहीम अत्यंत गोपनीय ठेवल्याने या मोहिमेची स्थानिक पोलिसांनाही शेवटच्या क्षणापर्यंत याची कल्पना नव्हती. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आयपीएस दर्जाचे अधिकाऱ्यांनी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.राज्यातील तरुणांना चुकीच्या मार्गाला लावून या तरुणांचे 'ब्रेनवॉशिंग' करून त्यांना सक्रिय करण्याचे प्रयत्न होत असल्याच्या संशयातून ही कारवाई करण्यात आली असल्याचे बोलल्या जात आहे. संशयितांचे काही आंतरराष्ट्रीय किंवा आंतरराज्य दहशतवादी संघटनांशी संबंध आहेत का.? याचाही तपास सुरू आहे. जप्त केलेल्या लॅपटॉप आणि मोबाईलमधून मोठी माहिती हाती लागण्याची शक्यता सूत्राकडून वर्तविण्यात आली आहे. या दहशतवाद विरोधी पथकाने अनेक संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. अद्याप कोणालाही रीतसर अटक केलेली नाही. आक्षेपार्ह साहित्य आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पुढील पावले उचलली जातील," असं दहशतवाद विरोधी पथकांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूत्राकडून कळाले आहे.

# महागाव तालुक्यात साई (ई) येथे गांजासह आरोपी ताब्यात



**महागाव, दि.१५, महासागर प्रतिनिधी**: तालुक्यातील काळी दौलत खान ते साई इजारा रोडवर गांजाची वाहतूक करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. ही कारवाई शुक्रवारी दिनांक १३ फेब्रुवारी रोजी करण्यात आली. संशयिताला ताब्यात घेण्यात आले.

आरोपीकडून ६ किलो २७२ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत १ लाख ६५ हजार ४४० रुपये इतकी आहे. संबंधित दुचाकी (क्रमांक MH २९ N २८७७) जप्त करण्यात आली आहे.ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव सुनील दादाराव आगोसे (वय ३२, रा. हिवळणी) असे आहे.या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा (NPdS Act १९८५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक सतीश चावरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखा पुसद ही कारवाई करीत आहे.यापूर्वीही या भागात मोठ्या प्रमाणात गांजाची शेती आढळून आली होती. शेतात व जंगल परिसरात गांजाची लागवड केल्याचे प्रकार समोर येत असून पोलिसांकडून वेळोवेळी धाडी टाकून कारवाई करण्यात येत आहे.

# खरूस खुर्द- टेंभूरदरा रस्त्यावरील भीषण अपघातात तरुणाचा मृत्यू



**ढाणकी, दि.१५, महासागर प्रतिनिधी**: खरूस खुर्द ते टेंभूरदरा मार्गावर झालेल्या एका भीषण रस्ता अपघातात, २३ वर्षीय युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. माधव मारुती बडेवार (वय २३ वर्ष, रा. बिटरगाव बु.) असे मृत युवकाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास खरूस खुर्द ते टेंभूरदरा रस्त्यावर अपघात झाल्याची माहिती फोनद्वारे बिटरगाव पोलीस ठाणेदार पांडुरंग शिंदे यांना मिळाली. घटनेची माहिती मिळताच बिटरगाव पोलीस ठाण्याचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी रवाना झाले. पोलिसांनी अपघातग्रस्त युवकाला तातडीने उपचारासाठी ढाणकी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले.डॉक्टरांनी तपासून माधव बडेवार याला 'मृत' घोषित केले. बिटरगाव परिसरामध्ये या घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेची माहिती तातडीने मृताच्या नातेवाईकांना देण्यात आली. पुढील तपास बिटरगाव पोलीस ठाणेदार पांडुरंग शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार रोशन सरनाईक , रवी गीते, मोहन चाटे, जाधव पुढील तपास करत आहेत.

## राष्ट्रध्वज पूर्ववत जागेवर लावण्याची मागणी

**मारेगाव , दि.१५, महासागर प्रतिनिधी**: तालुक्यातील चिंचाळा येथील ग्रामपंचायत कार्यालयाने राष्ट्रध्वजाचा खांब सांडपाणी वाहते त्याठिकाणी लावला असून, तो तेथून हटवण्यात यावा. हा खांब पूर्ववत जुन्याच ठिकाणी ठेवावा, अशी मागणी चिंचाळा येथील दिगांबर आत्राम यांनी ग्रामपंचायतीच्या सचिवांकडे निवेदनातून केली आहे. मागील २५ ते ३० वर्षापासून ग्रामपंचायत कार्यालयाचा राष्ट्रध्वज हा जिल्हा परिषद शाळेला लागून होता. त्याच ठिकाणी आजतागायत झेंडावंदन केले जात होते. परंतु, ग्रामपंचायतीने मात्र आता सांडपाणी वाहते तेथे राष्ट्रध्वजाचा खांब त्याठिकाणी लावला आहे. यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान टाळण्यासाठी हा खांब पूर्ववत ठिकाणी लावावा, अशी मागणी केली आहे.

# कर वसूलीबाबत सूचना न देता न.प.व्दारा कारवाई

**उमरखेड, दि.१५, महासागर प्रतिनिधी**: कोणतीही लेखी पुर्वसूचना, किंवा पाठपुरावा न करता उमरखेड नगरपरिषदेकडून केवळ सुडबुद्धीच्या भावनेतून महावितरणचे उमरखेड येथील उपविभागीय कार्यालयाला थकीत कराचा दाखला देत सिल करण्यात आले. निश्चितच नगरपरिषदेला कर लावण्याचा आणि लावलेले कर वसूल करण्याचा अधिकार आहे. तसेच कार्यालय सिल करण्यापूर्वी संबंधित कार्यालयाला एकुण कराची डिमांड देणे, नोटीस देणे हे गरजेचे आहे. परंतू तसे न करता केवळ महावितरणने नियमानुसार केलेल्या कारवाईवर सुडबुद्धी म्हणून महावितरणचे कार्यालय सिल करण्याची कारवाई नियमबाह्य असल्याचे अधीक्षक अभियंता प्रविण दरोली यांनी स्पष्ट केले आहे.

वारंवार आवाहन, स्मरण पत्रासह, प्रत्यक्ष पाठपुरावा करूनही वीजबिल भरण्यास प्रतिसाद न देणाऱ्या शासकीय कार्यालयाचा वीज पुरवठा १२ फेब्रुवारीला २४ तासासाठी टोकन डिस्कनेक्शन म्हणून खंडित करण्यात येईल असे आवाहन करण्यात आले होते. उमरखेड नगरपरिषेदेकडून पाणी पुरवठा योजना ग्राहक क्रमांक ३७००१९००४१००, आणि पाणी शुध्दीकरण केंद्र ग्राहक क्रमांक ३७००१९००४५४० चे माहे डिसेंबर २०२५ चे वीजबिल एकुण १० लाख १८ हजार २५० रूपये थकीत आहे. परंतू उमरखेड नगरपरिषदेकडून महावितरणने १७ जानेवारी व १९ जानेवारीलाला पाठविलेले इमेल, तसेच प्रत्यक्ष पाठपुराव्याला केराची टोपली दाखवली आणि वीज बिल भरण्याबाबत कोणतीची हालचाल करण्यात आली नाही. त्यामुळे नाईलाजास्तव महावितरणकडून टोकन डिस्कनेक्शनची कारवाई करण्यात आली. त्यानंतर लगेच नगरपरिषदेकडून तत्काळ वीजबिल भरण्यात आल्यानंतर महावितरणने जराही विलंब न करता वीज पुरवठा पुर्ववत केला.

याऊलट नगरपरिषदेकडून महावितरणकडे असलेल्या ५ लाख ६५ हजार रूपये कराच्या वसूलीसाठी कोणताच पाठपुरावा करण्यात आला नाही, किंवा नगरपरिषदेचे कर भरण्यात आले नाही, तर कार्यालय सिल करण्यात येईल, अशी कोणतीच नोटीस महावितरणला दिली नाही. परंतू केवळ महावितरणने रितसर केलेल्या कारवाईचा सुड घेत थकीत कराचे कारण समोर करत चक्क महावितरणच्या कर्मचाऱ्यांना बाहेर काढत कार्यालय सिल केले, अशी माहिती उपकार्यकारी अभियंता प्रशांत अंबाडकर यांनी दिली.

# 'व्हॅलेंटाईन डे' च्या दिवशीच पोक्सो दाखल

■ दोघेही नवव्या वर्गातील विद्यार्थी

**उमरखेड, दि.१५, महासागर प्रतिनिधी**: एका १५ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीने, ९ व्या वर्गातच शिकत असलेल्या एका आरोपी विद्यार्थाकडून होत असलेल्या सततचा पाठलाग, त्रास व आत्महत्येच्या धमक्यांबाबत उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार केली.

या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी पोस्को दाखल केला आहे. ही घटना १४ फेब्रुवारी दुपारी उघडकीस आली असून, घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

फिर्यादी विद्यार्थीनी एका शाळेत इयत्ता ९ वी मध्ये शिकत आहे. तिच्याच वर्गात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्या विरोधात पोस्कोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जबाबानुसार इयत्ता ८ वी पासून आरोपी तिच्याकडे वारंवार एकटक पाहणे, शाळेत व शाळेबाहेर पाठलाग करणे असे प्रकार करीत होता. शाळेच्या व्हाट्सअप ग्रुपमधून मुलीच्या वडिलांचा मोबाईल क्रमांक मिळवून आरोपीने आय लव्ह यु असा संदेश पाठविला होता. याबाबत मुलीच्या भावाने संबंधित मुलाला समज दिल्यानंतरही प्रकार थांबला नाही. उलट, तू माझ्याशी बोलली नाहीस तर मी आत्महत्या करेन, हाताची नस कापेन अशा धमक्या देत भावनिक ब्लॅकमेल केल्याचा आरोप आहे. स्नॅपचॅट आयडीवरून वारंवार प्रेमाचे संदेश पाठविणे, शाळेत व बाहेर भेटण्यासाठी दबाव टाकणे अदि बाबी सामील आहेत. शाळेतील शिक्षकांनीही यात मध्यस्थी करत समज दिली होती.

दरम्यान व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी आरोपी विद्यार्थ्याने, फिर्यादी विद्यार्थिनीला एकट्यात भेटण्याचा हट्ट केला, न भेटल्यास हाताची नस कापून घेण्याची धमकी दिली असा आरोप फिर्यादी विद्यार्थिनीने तक्रारीतून केला आहे. प्रकरणाची माहिती घरी कळताच आईसह पोलीस स्टेशनला झालेल्या फिर्यादी विद्यार्थिनीने तक्रार केल्यावरून आरोपी विरुद्ध कलम ७८ (१) (i) (ii) भाण्यास १२ पोक्सो प्रमाणे गुन्हे नोंद केला आहे.

# जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांच्या नृत्याने घेतल्या प्रेक्षकांच्या टाळ्या



**ढाणकी, दि.१५, महासागर प्रतिनिधी**: जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत आयोजित बालकलाकरांचा कलाविष्कार किलबिल सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला . चिमुकल्यांच्या कलागुणांना वाव मिळावी म्हणून दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येते. बालकलाकारांनी विविध नाट्य, कोळी नृत्य, बंजारा गीत, सांस्कृतिक एकता अशा विविध विषयांवर कला गुण सादरीकरण केले. "चिमणी उडाली भुर्र "या लग्न गीताने उपस्थितांचे मन जिंकले. चिमुकल्यांनी विविध नाट्यछटा सादर करून विविधतेतून एकता साधण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपंचायत अध्यक्षा अर्चना सुंदरकांत वासमवार.जि प चे माजी सदस्य बाळू पाटील चंद्रे, दीपक पाटील चंद्रे, हमीद भाई ठेकेदार, प्रकाश जयस्वाल, संबोधी गायकवाड, तुळशीराम गायकवाड, शेख अहेमद शेख मिरांजी,राजु गोपेवाड, नितेश लकडे , कांबळे, मोरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पाईकराव, सर्व समिती सदस्य , पालक वर्ग या उपस्थित होते. जिजाऊंच्या प्रतिमेची पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.जय मल्हार ऍग्रो चे ओनर नितेश लकडे यांच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी शाळेला साउंड सिस्टीम भेट दिली त्या बद्दल त्यांचे शाळेच्या मुख्याध्यपिका गोपेवाड यांनी व शाळा व्यवस्थापन समितीने आभार व्यक्त केले. लावणी, लोकगीत, यावर विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमासाठी शाळेचे केंद्रप्रमुख संतोष कुंभारवार, मुख्याध्यापिका ज्योती बल्लाळ (गोपेवाड), व सर्व शिक्षक वर्ग यांनी परिश्रम घेतले.मुख्याध्यापिका ज्योती बल्लाळ यांनी प्रस्थाविक केले.

## वसंत नगर तांड्यातील कामाच्या चौकशीची मागणी

**महागाव**: तालुक्यातील वसंत नगर तांडा, लेवा येथे आमदार निधीतून सुरू असलेल्या रस्ते बांधकामात कमी प्रमाणात साहित्य वापरले जात आहे. कॅनॉलपासून ते नथू राठोड यांच्या घरापर्यंत करण्यात येत असलेल्या रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार झाला आहे. आवश्यक त्या प्रमाणात साहित्य न वापरता बोगस पद्धतीने काम पूर्ण केल्याचे दिसून येत आहे.

# विस्तार अधिकारीकडे ग्रामपंचायतीचा कारभार

**यवतमाळ, दि.१५, महासागर प्रतिनिधी**: बाभूळगाव तालुक्यातील ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपणार असल्याने आता हा कारभार विस्तार अधिकारी पंचायत यांच्या सुपूर्द केला जाणार आहे. तालुक्यात ६५ ग्राम पंचायती असून त्यांचा कार्यकाळ अलीकडे संपणार असल्याने, ग्राम पंचायतीचा कारभार आता ग्राम सेवकाच्या जागी विस्तार अधिकारी पाहणार असल्याचे सांगण्यात आले.

तालुक्यात एकूण ६५ ग्रामपंचायती आहे त्यापैकी दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी २७ ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपणार आहे . तर २१ फेब्रुवारी रोजी २८ ग्रामपंचायततिचा कार्यकाळ संपून गटविकास अधिकारी यांच्या आदेशाने विस्तार अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाणार आहे. बाभूळगाव पंचायत समितीला एकूण दहा विस्तार अधिकारी आहे. पैकी दोन विस्तार अधिकारी पंचायत, दोन विस्तार अधिकारी सांख्यिकी, दोन विस्तार अधिकारी कृषी, दोन विस्तार अधिकारी आरोग्य व दोन विस्तार अधिकारी शिक्षणचे आहे. आता गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांना कोणती ग्राम पंचायत कोणत्या विस्तार अधिकाऱ्याकडे द्यावी याचा निर्णय घ्यावा लागणारआहे. शिवाय ज्या ग्राम सेवका बद्दल गावातून तक्रारी आहे. त्याला दुसरी ग्राम पंचायत देऊन तक्रारी टाळण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

तालुक्यात ६५ ग्रामपंचायती असल्या तरी काही ग्रामपंचायती अत्यल्प लोकसंख्येच्या आहेत यामुळे चांगल्या व मोठ्या ग्रामपंचायतीवर कोणाला नियुक्ती द्यावी हा मोठा जटील प्रश्न आहे. काही ग्रामपंचायती मध्ये मोठ्या प्रमाणावर विकास कामे सुरू आहे. यामुळे आता कोणाची वर्णी कुठे लागेल हा प्रश्न गुलदस्त्यात आहे. असे असले तरी ज्या ग्रामसेवका संदर्भात गावकऱ्यांकडून वारंवार तक्रारी केल्या जात आहे त्या ग्रामसेवकाला त्याच्या आवडत्या ग्रामपंचायत मधून बाजूला करून तक्रारी टाळण्याचा प्रयत्न केला जाण्याची ही शक्यता वर्तवली जात आहे.

# गुरुदेव सेवा मंडळातर्फे भाऊसाहेब थुटे यांचा सत्कार



**पुसद, दि.१५, महासागर प्रतिनिधी**: गुरुदेव सेवा मंडळ, तालुका शाखा, पुसदच्यावतीने माजप्रबोधनकार, सप्तखंजिरीवादक इंजिनिअर भाऊसाहेब थुटे यांचा ग्रामगीता ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी इंजिनिअर भाऊसाहेब थुटे यांनी गुरुदेव सेवा मंडळ, तालुका शाखेला भेट देऊन मंडळाच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी मंडळाचे तालुकाध्यक्ष प्रा. प्रकाश लामणे, कार्याध्यक्ष प्रा. नंदकुमार खैरे, सचिव ॲड गजानन साखरे, मध्यवर्ती प्रतिनिधी यशवंत देशमुख, मार्गदर्शक रमेश सरागे, पदाधिकारी ज्ञानेश्वर सुरडकर, नरेश ढाले, शिवशंकर नागरे, गायक मोहन चोरे, प्रदीपपाल महाराज, सौरभ थुटे, भाऊ ठोसर, आदी उपस्थित होते.

# कवी, लेखकच समाजाला दिशा देऊ शकतात- राम देवसरकर



**उमरखेड , दि.१५, महासागर प्रतिनिधी**: वर्तमान काळात कवी, लेखकच समाजाला दिशा देऊ शकतात. विद्यार्थ्यांनी संधीचा फायदा घेऊन करिअर करून स्वतःच्या पायावर उभे राहावे, असे प्रतिपादन यवतमाळ जिल्हा कुणबी समाज संस्थेचे अध्यक्ष व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ सिनेट सदस्य राम देवसरकर यांनी केले. गोपिकाबाई सीताराम गावंडे महाविद्यालयात आयोजित "कलाविष्कार" स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यवतमाळ जिल्हा कुणबी समाज संस्थेचे सचिव डॉ. यादवराव राऊत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. छत्रपती संभाजीनगर येथील साहित्यिक व कवयित्री गुंजन पाटील, प्राचार्य डॉ. माधव कदम, महाविद्यालय सल्लागार समितीचे सदस्य दत्तराव शिंदे, सुभाषराव शिंदे, आयक्युएसी समन्वयक प्रा. डॉ. कुंतल बोंपिलवार व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधवराव कदम यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा चढता आलेख मांडला. या प्रसंगी आयक्युएसीने तयार केलेले न्यूजलेटर व अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. उषा पाटील यांच्या चार पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन झाले.

डॉ. यादवराव राऊत यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.स्नेहसंमेलनात समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या वरिष्ठ सल्लागार समितीचे सदस्य ॲड. विलासराव देवसरकर व अमोल इंगळे यांनी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वंशिका गंगात्रे, कल्याणी वानखेडे, या विद्यार्थ्यांनी केले.

### उमरसरा येथे महारक्तदान, आरोग्य तपासणी

**यवतमाळ :** येथील उमरसरा परिसरातील नर्मदेश्वर महादेव मंदिर सेवा समितीच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त १६ फेब्रुवारी रोजी महारक्तदान, मोफत आरोग्य तपासणी शिबिर आणि नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सत्कार आयोजित करण्यात आला आहे. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके राहतील. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर आभाळे उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम सकाळी १०:०० वाजता यशोधरा नगरातील नर्मदेश्वर महादेव देवस्थानच्या प्रांगणात होणार आहे. दरम्यान, १५ फेब्रुवारी रोजी अभिषेक व भजनसंध्या आयोजित करण्यात आली आहे.

# ८७७ गावांना बसू शकते झळ; पंधरा कोटींचा टंचाई आराखडा

## ▪ जिल्हाधिकाऱ्यांकडे मंजुरीसाठी प्रस्ताव ▪ परिस्थिती हाताळण्यासाठी 1 हजार 40 विविध उपाय

**यवतमाळ, दि.१५, महासागर प्रतिनिधी:** जिल्ह्यात यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस आणि अतिवृष्टी होऊनही संभाव्य पाणीटंचाईचे संकट गडद होताना दिसत आहे. प्रशासनाने तयार केलेला आगामी काळातील पाणीटंचाई कृती आराखडा तब्बल १५ कोटी रुपयांच्या घरात पोहोचला आहे.

जिल्ह्यातील ८७७ गावांमध्ये पाणीटंचाई भासण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. परिस्थिती हाताळण्यासाठी एक हजार ४० विविध उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. हा सविस्तर आराखडा आता अंतिम मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आला असून, प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे.

जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाने संभाव्य पाणी टंचाईचा लक्षात घेता आतापासूनच तयारी सुरू केली आहे. यंदा टंचाई आराखड्यात ८७७ गावांचा समावेश करण्यात आला आहे. बदा सरासरीपेक्षा जास्त पर्जन्यमान होऊनही ग्रामीण भागातील नागरिकांना उन्हाळ्यात टंचाईची झळ सहन करावी लागणार आहे.

दरवर्षी टंचाईवर ९ ते १० कोटी रुपये खर्च आणि विशेष म्हणजे जिल्हा खनिज विकास निधी व जलजीवन मिशनतंर्गत कामे केली जात आहेत. मात्र कायमस्वरूपी उपाययोजना



करण्यास पाणी पुरवठा विभाग अपयशी ठरत आहे. त्यामुळे यंदा टंचाईचा संभाव्य कृती आराखडा १५ कोटी १४ लाख रुपयांवर पोहोचला आहे.

यावर्षी खासगी विहीर अधिग्रहणासाठी ४ कोटी ६३ लाख ८६ हजार रुपयांचे नियोजन केले आहे. टैंकर, बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा, नळ योजना विशेष दुरुस्ती, तात्पुरतीपूरक नळ योजनेवरही तरतूद करण्यात आली आहे. हा कृती आराखडा अंतिम मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला आहे.

जिल्ह्यात जलजीवन मिशनच्या माध्यमातून दीड हजारांवर कामे प्रस्तावित आहे. बहुतांश कामे सुरू झालेली आहे. परंतु मागील काही महिन्यांपासून जलजीवनचा निधी शासनाने वितरित केला नाही. परिणामी, कामे ठप्प पडली आहे.

पाणी पुरवठा विभागाकडून सातत्याने निधीची मागणी केली जात आहे. तरीसुद्धा निधी वितरित करण्यात आला नाही. प्रस्तावित जलजीवनची कामे पूर्ण झाली. तर टंचाईला बऱ्याच अंशी ब्रेक लागण्याची शक्यता आहे. सध्यातरी जलजीवनची कामे पाणी पुरवठा विभागासाठीच डोकेदुखी ठरत आहे.

जिल्ह्याचा संभाव्य पाणीटंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात म्हणजेच जानेवारी ते मार्च या तिमाहीत २५६ गावांना टंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी प्रशासनाने ८ कोटी ३३ लाख रुपयांची भरघोस तरतूद केली आहे.

विशेष म्हणजे, उन्हाळ्याचा कडाका वाढल्यानंतर म्हणजेच एप्रिल ते जून या कालावधीत टंचाईचे संकट अधिक गडद होणार असून त्यावेळी ६२१ गावांमध्ये पाणीबाणी निर्माण होण्याची भीती आहे. त्यासाठी स्वतंत्र ६ कोटी ८१ लाख रुपयांचा प्रस्ताव आखण्यात आला असून, प्रशासन आतापासूनच सज्ज झाले आहे.

## संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात साजरी




**महागाव , दि.१५, महासागर प्रतिनिधी:** १५ फेब्रुवारी रोजी संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी स्वर्गीय वसंतराव नाईक व सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमास डॉ. पंजाब राठोड, आत्माराम राठोड, डॉ. गजानन जाधव, राठोड, चव्हाण, माजी नगरसेवक राठोड तसेच बंजारा समाजाचे कार्यकर्ते व गावातील सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अनेक वर्षांपूर्वी संत सेवालाल महाराजांचे थैलचित्र स्थापित करण्यात आले असून, दरवर्षी त्या ठिकाणी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे दरवर्षी मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती पाहायला मिळते.या आयोजनाचे श्रेय डॉ. राठोड, डॉ. जाधव आणि आत्माराम राठोड यांना जाते. त्यांच्या प्रयत्नांमुळे समाजात एकात्मता आणि भक्तीभाव दृढ होत असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

## पोलिस भरतीसाठी आलेल्या युवकांची निवास, भोजनाची सोय

### ▪ युवासेनेकडून प्रमिलादेवी राठोड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उपक्रम



**यवतमाळ , दि.१५, महासागर प्रतिनिधी:** पोलिस भरतीसाठी येणारे अनेक उमेदवार परिस्थिती अभावी रस्त्याच्या कडेला असलेल्या दुकानांसमोर झोपुन रात्र काढताना दरवेळी दिसुन येतात. ही बाब लक्षात घेता यंदा युवा सेनेच्या पुढाकारातून मातोश्री प्रमिलादेवी दुलीचंद राठोड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पोलिस भरतीसाठी येणाऱ्या उमेदवारांच्या निवासाची आणि भोजनाची निःशुल्क व्यवस्था करण्याचा उपक्रम राबवण्यात येत आहे. स्थानिक उत्सव मंगल कार्यालयात ना. संजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. शहरातमध्ये गेल्या तीन दिवसापासून सुरू असलेल्या सेवेचा लाभशेकडो उमेदवार घेत आहेत. जिल्ह्यातील पोलिस शिपाई पदांच्या रिक्त असलेल्या १६१ पदांसाठी भरती प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. या भरतीसाठी जिल्ह्यातून नव्हे तर संपूर्ण राज्यातून सुमारे १४ हजार उमेदवार येणार आहे. दरदिवशी सुमारे ७५० उमेदवारांना मैदानी चाचणीसाठी पाचारण करण्यात येत आहे. भरती प्रक्रिया २५ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. दूरवरून येणाऱ्या, आर्थिकदृष्ट्या गरीब उमेदवारांना राहणे व जेवणाची सोय व्हावी, या हेतूने स्थानिक उत्सव मंगल कार्यालयात हा सेवाभावी प्रकल्प राबवण्यात येत आहे. उपक्रमाचा शुभारंभ १० फेब्रुवारी रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाणे, तहसीलदार योगेश देशमुख, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगनवार, जिल्हा समन्वयक संजय हातगावकर, नगरसेवक गजानन इंगोले, पत्रकार नितीन पखाले, दर्शना इंगोले, स्मिता दुर्गे, प्रीती उपरे, युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर यांच्या उपस्थितीत झाला. या उपक्रमात दररोज उमेदवारांची भोजन, निवास व्यवस्था करण्यात येत आहे. या सेवेमुळे परजिल्ह्यातून येणाऱ्या उमेदवारांना मोठा आधार मिळाला आहे. या उपक्रमात शिवसेना संपर्कप्रमुख श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, नीलेश बेलोकार, संजय भुमकाळे, सरला इंगळे, ज्योती चिखलकर, श्रीकांत आडे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते सक्रिय आहेत.

युवा सेनेच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या सेवेचे लाभ गेल्या गेल्या तीन दिवसांत तब्बल ८०० पेक्षा अधिक उमेदवारांनी घेतला. त्यात उपक्रमाच्या पहिल्याच दिवशी २००, दुसऱ्या दिवशी २५० पेक्षा जास्त तर तिसऱ्या दिवशी तब्बल ३५० पेक्षा अधिक उमेदवारांनी या सुविधेचा लाभ घेतला. दररोज सायंकाळी सहा वाजेपासून शिवसेना, युवासेना आणि महिला आघाडीचे पदाधिकारी स्वतः उपस्थित राहून उमेदवारांच्या व्यवस्थेची जबाबदारी सांभाळत आहेत.

### निःशुल्क आरोग्य तपासणी उद्या

**वणी :** येथील ज्येष्ठ नागरिक संघ व उपजिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी १७ फेब्रुवारी रोजी निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. डी. पी. रोडवरील स्व. गोपीनाथ मुंडे सभागृहात सकाळी ९ ते २ वाजेपर्यंत होणाऱ्या या आरोग्य तपासणी शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून विविध आजाराची निःशुल्क तपासणी केल्या जाईल व मार्गदर्शन केल्या जाईल. यामध्ये मधुमेह तपासणी, कोलेस्ट्रॉल तपासणी, रक्तदाब तपासणी यासह विविध चाचण्यांचा समावेश आहे, ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या आरोग्य शिबिरामध्ये या सर्व चाचण्या निःशुल्क असून या शिबिराचा ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## नायब तहसीलदारांच्या मध्यस्थीने उपोषण मागे



**वणी, दि.१५, महासागर प्रतिनिधी:** अडेगाव परिसरातील ईशान मिनरल डोलोमाइट कंपनी गेटसमोर सुरू असलेले सुमित नवनाथ क्षीरसागर यांचे आमरण उपोषण अखेर प्रशासनाच्या मध्यस्थीने मागे घेण्यात आले. ईशान मिनरल्स कंपनी गेल्या काही वर्षांपासून अडेगाव परिसरात कार्यरत आहे. कंपनीतून निघणाऱ्या धुळीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होत आहे.

काही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जात असली तरी नवनाथ महादेव क्षीरसागर यांना गेल्या ११ ते १२ वर्षापासून कोणतीही भरपाई मिळालेली नाही. त्यामुळे दरवर्षी ६० हजार रुपये नुकसान भरपाई तसेच आधीच्या नुकसानीसाठी तीन लाख ३० हजार रुपये देणे, बफर झोनमधील उत्खनन त्वरित थांबवन उत्खनन केलेल्या परिसराचे पुनर्भरण करणे, डी-वॉटरिंगमुळे परिसरात पाण्याची समस्या निर्माण झाल्याने ८० फुटाखालील डी-वॉटरिंग थांबवणे, रस्त्यावर नियमितपणे वॉटर टँकरद्वारे पाणी मारावे आदी मागण्या करण्यात आल्या होत्या. उपोषणाच्या चौथ्या दिवशी कॉंग्रेस नेते संजय खाडे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अंकुश बोढे व संभाजी ब्रिगेडचे नितेश ठाकरे यांच्या प्रयत्नाने नायब तहसीलदार प्रीतम राजगडकर व तलाठी मनीषा बरशेट्टीवार यांनी घटनास्थळी भेट देत दोन्ही बाजूंमध्ये चर्चा घडवून आणली. थकीत सुमारे एक लाख ४० हजारपैकी एक लाख रुपये देण्याचे व वार्षिक ४० हजार रुपये देण्याचे कंपनीने मान्य केले असून उर्वरीत मागण्या पुढील एक महिन्यात पूर्ण करण्याचे लिखित आश्वासन यावेळी देण्यात आल्यानंतर क्षीरसागर यांनी उपोषण मागे घेतले. या आंदोलनाला स्थानिक ग्रामस्थांचा पाठिंबा लाभला होता.

## हिवरी आश्रमशाळेची 'निसर्ग ते प्रशासन' शैक्षणिक सहल साजरी

**यवतमाळ , दि.१५, महासागर प्रतिनिधी:** पांढरकवडा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प उपक्रमांतर्गत हिवरी व कापरा आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी निसर्ग ते प्रशासन अशी अनोखी शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वनसंपदा आणि प्रशासकीय कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. टिपेश्वर अभयारण्यात भेट देऊन वन्यजीव, पर्यावरण संवर्धन आणि जंगल संरक्षणाबाबत माहिती घेतली. जंगल भ्रमंतीदरम्यान हरीण, नीलगाय आणि वाघाचे दर्शन झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण झाला. यानंतर पांढरकवडा येथील प्रकल्प कार्यालय, पोलिस ठाणे, उपविभागीय कार्यालय व तहसील कार्यालयाला भेट देण्यात आली. विविध कार्यालयांचे कामकाज, प्रशासकीय जबाबदाऱ्या आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांबाबत विद्यार्थ्यर्थ्यांनी प्रत्यक्ष माहिती जाणून घेतली. तहसीलदार राजेंद्र इंगळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत प्रशासनात उच्च पदांवर जाण्याचे प्रेरणादायी मार्गदर्शन केले.प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांनी आदिवासी विकास योजनांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची पुस्तके भेट देण्यात आली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच निसर्ग आणि प्रशासन यांचा अनुभव मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. दरम्यान विद्यार्थ्यांनी देखील अनेक विषयाबद्दल कुतुहल निर्माण झाले असल्याने त्यांच्यातील निसर्गप्रेम दिसून आले.

### पत्रकार नारायणराव वंजारी यांना श्रद्धांजली

**नेर , दि.१५, महासागर प्रतिनिधी:** तालुका पत्रकार संघाच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार नारायणराव वंजारी यांना येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या सभेत श्रद्धांजली वाहण्यात आली. या वेळी त्यांच्या सामाजिक योगदानाची आठवण करून देण्यात आली. याप्रसंगी अध्यक्षस्थानी पत्रकार संतोष अरसोड होते. अंकश वाकडे, प्रा. सुरेश ढोके, अरुण राऊत, उदय कानतोडे, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पाटमासे, नीलेश वाहणे, प्रवीण रामटेके, रियाज टिक्की, उमेश इंगोले, साहेबराव सावळे, राजेश खोडके, किशोर वंजारी, नीलेश वंजारी, सागर गुल्हाने, रवी राऊत, गुलाबखाँ पठाण आदी उपस्थित होते.

### महाशिवरात्रीनिमित्त रामपूर येथे दहीहंडी आज

**पांढरकवडा, दि.१५, महासागर प्रतिनिधी:** श्री संत ढिगोले महाराज मठ रामपूर (कारेगाव) येथे सोमवारी १६ फेब्रुवारीला दुपारी १ वाजता महाशिवरात्री निमित्ताने दहीहंडी व महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रामपूर परिसरातील भाविकांनी या दहीहंडी व महाप्रसाद वितरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## केशरबाई चाहल स्मृती सामाजिक पुरस्कार वितरण



**पांढरकवडा , दि.१५, महासागर प्रतिनिधी:** येथील केशरबाई चाहल स्मृती प्रतिष्ठानच्यावतीने स्व. केशरबाई चाहल यांच्या ३८व्या स्मृतिदिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान व गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण समारंभ श्री शारदा ज्ञानपीठच्या प्रांगणात पार पडला. माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला अतिथी म्हणून नागपूर येथील ज्येष्ठ पत्रकार बाळ कुळकर्णी व विस्तार अधिकारी गोकुल गंधे उपस्थित होते.

सन २०२४-२५चा 'केशरबाई चाहल स्मृती सामाजिक पुरस्कार' येथील हिंदू मुस्लिम एकता व सामाजिक सौहार्दाचे प्रतीक म्हणून ओळखले जाणारे जामा मस्जिद ट्रस्ट व शांतता कमिटी अध्यक्ष काजी गजनफर अली यांना जाहीर झाला होता.

या पुरस्काराचे स्वरूप ११ हजार रुपये रोख, शाल आणि स्मृतिचिन्ह असे आहे. तसेच सन २०२३-२४चा केशरबाई स्त्री पुरस्कार संवेदनशील कवयित्री, समीक्षक व चिंतनशील लेखिका पुष्पा पाटील (मीना बिसेटवार) यांना जाहीर झाला होता. साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना पाच हजार रुपये रोख, शाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. शालांत परीक्षेत उत्कृष्ट यश मिळविणाऱ्या शेखर सुरेश मल्लेलवार, कल्याणी विष्णू कराळे, टिया हरिभाऊ गुरनुले, हंसिका मनीष बुरैवार, साची दीपक वरगणे, श्रुती राजीव आगरकर, शेखर सुरेश मल्लेलवार या विद्यार्थ्यांना सन्मानित केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजितसिंह यांनी प्रास्ताविक केले. अतिथी बाळ कुळकर्णी यांनी केशरबाई चाहल यांच्या स्मृती जपताना समाजहिताचे कार्य सातत्याने सुरू ठेवण्याचे आवाहन केले. संचालन व्यवस्थापक तनवीर शेख यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रिया उमरे यांनी करून दिला. राहुल देवतळे यांनी आभार मानले.

## » संक्षिप्त...

### दातोडी येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**आर्णी:** आर्णी पंचायत समिती अंतर्गत दातोडी येथील मातोश्री सुरताबाई माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांचे मार्गदर्शन, मित्रांची साथ आणि शाळेतील अविस्मरणीय क्षणांना उजाळा दिला. कार्यक्रमाला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजू चव्हाण, मुख्याध्यापक देविदास आडे, शिक्षक नवलाखे, राठोड, पवार, चव्हाण, कांबळे, ताई कुसराम, कर्मचारी श्याम हांडे, श्याम चव्हाण आदी उपस्थित होते.

### बौद्ध महासभेतर्फे अभिवादन कार्यक्रम



**यवतमाळ :** दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौध्द महासभेच्या वतीने स्थानिक पिंपळगाव येथील बोधिसत्व बुध्द विहारात माता रमाई जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी रंजनाताई ताकसांडे होत्या. मंचावर बौद्ध महासभा कार्यकारिणीचे रवी भगत, मोहन भवरे, संगीताताई कुंभारे, सिद्धार्थ बन्सोड, नागोराव बन्सोड, आदी उपस्थित होते. रमाईने डॉ. बाबासाहेब आंबेडकर या उत्तुंग व्यक्तिमत्वाच्या संघर्ष काळात धीरोदात्तपणे साथ दिली. चवदार तळे आणि चळवळीत कार्यकर्त्यांना रमाईने धीर दिला. वसतिगृहातील मुलांसाठी सोन्याचे दागिने मोडले. म्हणून कार्यकर्ती रमाई या दृष्टीने अभ्यासकांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू संशोधित करून ते समाजाला सांगावे, असे प्रतिपादन डॉ. शांतरक्षित गावंडे यांनी यावेळी केले. बुद्धवंदनेनंतर समता सैनिक दलाची मानवंदना देण्यात आली. उद्घाटनपर भाषण रवी भगत, तर रंजनाताई ताकसांडे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिभाताई रामटेके यांनी केले. कुसुमताई भवरे यांनी परिचय करून दिला. सूत्रसंचालन वंदनाताई कानंदे यांनी केले. कांचनताई अंबागडे यांनी आभार मानले. यावेळी तालुका व जिल्हा शाखेचे पदाधिकारी, केंद्रीय शिक्षक, आदी उपस्थित होते.

### स्वर्णलीला स्कूलमध्ये स्नेहसंमेलन



**वणी:** येथील अल्फोर्स स्वर्णलीला इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी 'उडान' या शीर्षकाखाली वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या शैक्षणिक प्रगतीचा गौरव करण्यासोबतच त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. वाद्यवृंद सादरीकरण, समूह व एकल गीते, तसेच आकर्षक नृत्याविष्कारांनी कार्यक्रमाला रंगत आणली. विशेष म्हणजे संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थ्यांनीच केले. कार्यक्रमाला पालक व कुटुंबीयांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाला गटविकास अधिकारी किशोर गज्जलवार, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवे, उपविभागीय अधिकारी नितीनकुमार हिंगोले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले. अल्फोर्स ग्रुप ऑफ स्कूल्स अँड कॉलेजेसचे अध्यक्ष डॉ.व्ही. नरेंद्र रेड्डी, प्राचार्या अन्नपूर्णा पवन व उपप्राचार्य विक्की मोहानी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

### दारव्हा तालुक्यातील रस्त्याची चाळण

**दारव्हा:** वळसा ते जवळा ब्रह्मनाथ या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे आता जीवावरचा खेळ झाला आहे. रस्त्याची इतकी दुरवस्था झाली आहे की, वाहनधारकांना खड्डे चुकवताना नाकीनऊ येत आहेत. वारंवार मागणी करूनही दुरुस्ती होत नसल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर बहुजन मुक्ती पार्टीने प्रशासनाला जाग आणण्यासाठी तातडीने डांबरीकरण करण्याची मागणी केली असून, दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. वळसा ते अंतरगाव दरम्यान रस्त्यावर असलेल्या पाईप पुलाला मोठे भगदाड पडले आहे. हा पूल कधीही कोसळण्याच्या स्थितीत असून, येथे अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तर अंतरगाव ते जवळा ब्रह्मनाथ या मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने मोटारसायकल, ऑटो, बसचालक तसेच पादचाऱ्यांना वाहतूक करणे कठीण झाले आहे. जवळा येथील प्रवासी निवाऱ्याची स्थितीही अत्यंत धोकादायक आहे. केवळ सहा खांब उभे असून संपूर्ण निवारा गायब झाला आहे. हे खांब कधीही कोसळून मोठी दुर्घटना होऊ शकते. 'एखादी जीवितहानी झाल्यास त्याला जबाबदार कोण, असा सवाल बहुजन मुक्ती पार्टीचे लोकसभा अध्यक्ष (यवतमाळ / वाशीम) बिमोद मुधाने यांनी उपस्थित केला आहे. सर्व खड्डे बुजवून तातडीने डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी पालकमंत्री, जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

RNI NO. - 2010/35799
Mahasagar Yavatmal
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Bus Stand square, Near Hotel Prakash, Yavatmal. Head Office Phone no: 0712-2767628-9922970023. **Group Editor-in-Chief and Managing Director**- Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor**-Raghuvirsingh Chauhan Phone no-9423433244 (Responsible for editorial as per PRB act).

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक २०१०/३५७९९
महासागर यवतमाळ
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, बस स्टॅन्ड चौक, हॉटेल प्रकाश जवळ, यवतमाळ, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *रघुवीरसिंह चौहान, फोन : ९४२३४३३२४४* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

